# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 35 ) 1st August 2010 ( No : 07


## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

Vidyapeeth Vidyarthi Bhavan, B-Road, Churchgate, Mumbai 400 020


**Prof. C.R. Sadasivan**
*President*
A/205 R.K. Gokuldham, S.V.Road, Borivli (W), Mumbai 400 092
*(022 2806 3667 Mb 98207 81441)*

**Prof. E.H. Kathale**
*General Secretary*
N/162 Reshimbagh, Nagpur – 400 009.
*(0712 274 1098) (Mb 98222 84361)*


**4 th AUGUST 2010**

**Shri Kapil Sibal**
Hon'ble Minister for Human Resource Development, Union of India, Shastri Bhavan, New Delhi.

**Subject: Qualification of NET/SET for University & College Lecturers in Maharashtra – Proper and legal implementation thereof**

Hon'ble Minister, Sir:

You will recall that on behalf of the Teachers of the Universities and Colleges in Maharashtra, a delegation of MFUCTO met your good self on Monday, 2 nd August 2010 at 1.00 p.m., accompanied by Shri Basudev Acharia, Hon'ble Member of Parliament. The delegation explained to you the facts and the circumstances under which several thousands of cases of non-NET/SET teachers from Maharashtra came to be referred to the UGC through the Universities concerned for claiming exemptions under the UGC Regulations notified on 19 th September 1991 and/or on 4 th April 2000 supported by three Judgments of the Hon'ble Division Bench of the High Court at Bombay, Aurangabad and Nagpur. It was pointed out that the Order dated 30 th March 2010 of the HRD Ministry directing the UGC to withdraw/cancel its decision taken on 23 rd February 2010 and the consequent UGC decision dated 4 th May 2010 had the effect of cancelling exemptions legally granted to thousands of teachers from Maharashtra being treated as cancelled/ withdrawn. **The action was not only legally untenable but had the effect of causing gross injustice to teachers who had already put in many years of service and whose appointments were legal and proper in all respects.**

During the discussion your good self and one of your officials who was well versed in NET/SET matters including the cases of Maharashtra (Personal Secretary) pointed out that the Order dated 30 th March 2010 was directed against exemptions granted by the UGC in respect of Lecturers appointed on or after June 2009. There was no direction to cancel/withdraw any exemption granted to Lecturers appointed prior to June 2009. If the UGC has cancelled the exemptions granted in respect of Lecturers whose appointments fell between 19 th September 1991 and June 2009, it would be necessary for the MFUCTO to go back to the UGC and get the same rectified. If the UGC sought clarification on the actual import and effect of the HRD Order dated 30 th March 2010, the HRD Ministry would be more than willing to issue clarification.

Thereafter in order to see that urgent action was taken by the UGC you were good enough to direct that a meeting

**महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाचे निर्णय : ४ ऑगस्ट २०१०**

(१) बेशिस्त वाहनचालकांना वचक बसविण्यासाठी शिक्षेच्या तरतुदीत वाढ (२) जुन्या मोटार वाहनांना पर्यावरण कर लागू करण्याचा निर्णय (३) पनवेल, वसई, बोरीवली येथे नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालये (४) पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना (५) राज्य कामगार विमा योजनेचे कामकाज कामगार विमा महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यास मान्यता (६) भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणीसाठी अधिनियमात सुधारणा (७) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या महाविद्यालये व तंत्रनिकेतनातील पदांना सहावा वेतन आयोग.

## तंत्रशिक्षण संचालनालयाच्या महाविद्यालये व तंत्रनिकेतनातील पदांना सहावा वेतन आयोग

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत व्यवसायिक अभ्यासक्रमातील पदवी व पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालये व तंत्र निकेतनातील शिक्षकीय पदांना तथा ग्रंथपालांना सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनसंरचना लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या दिनांक ५ मार्च २०१० रोजीच्या अधिसूचनेनुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्त्याखाली कार्यरत व्यवसायिक अभ्यासक्रम (अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र, व्यवस्थापन शास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी इ.) राबविणाऱ्या शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालये तथा तंत्रनिकेतनातील विविध शिक्षकीय पदे व ग्रंथपालांना ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचना लागू करण्यात येणार आहे. **शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थातील शिक्षक व ग्रंथपालांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने जाहिर केलेल्या सुधारित वेतन संरचना व त्या अनुषंगाने देय ठरणारा महागाई भत्ता दिनांक १ जानेवारी २००६ पासून लागू होईल.**

उपरोक्त प्रमाणे सुधारित वेतन संरचना लागू झाल्यामुळे दिनांक ३१ मार्च २०१० अखेरपर्यंत व्यवसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या शासकिय व अशासकिय अनुदानित पदवी व पदविका संस्थांतील शिक्षक व ग्रंथपालांना अनुक्रमे रुपये ८२ कोटी व रुपये १०८.२२ कोटी अशी एकूण रुपये १९०.२२ कोटी एवढी फरकाची रक्कम देय ठरेल. यापैकी पदवी संस्थांतील शिक्षकांना देय ठरणारी ८० टक्के फरकाची रक्कम म्हणजे रुपये ६५.६० कोटींची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून होणार आहे. उर्वरित रुपये १२४.६२ कोटीचा अनावर्ती भार तथा दिनांक १ एप्रिल २०१० पासून पुढे रुपये ४४.५३ कोटी प्रति वर्ष एवढा आवर्ती भार राज्यशासनावर पडणार आहे. *- शासनाच्या अधिकृत वेबसाईटवरुन घेतलेला मजकूर शब्दशः*

between the Chairman of the UGC and the MFUCTO be held immediately on the same day. The said meeting took place at 5.30 p.m., when the Chairman Dr. Sukhdev Thorat and the Vice Chairman along with some other officials of the UGC remained present. During the meeting, MFUCTO delegation pointed out to the UGC that after discussion with the Hon'ble Minister it had become clear that the HRD Ministry's Order dated 30 th March 2010 was directed against exemptions granted by the UGC in respect of Lecturers appointed on or after June 2009 and not at all in respect of Lecturers appointed prior to June 2009.

The Chairman of the UGC however stated that on a reading of the Order dated 30 th March 2010, the understanding reached by the UGC was different from what we were reporting based on MFUCTO meeting with the Hon'ble Minister. The Order of the HRD Ministry was ambiguous and it does not mention exemptions being allowed in respect of appointments prior to June 2009.

The Chairman then stated that if what we were stating was to be accepted, then a clarification from the HRD Ministry was necessary and that the UGC would certainly do so. It was then suggested that in order to get clarification on the right lines, it would be better if the MFUCTO put the facts once again before the Hon'ble Minister in a letter with a copy to the UGC. Hence this letter.

In view of this, MFUCTO is compelled to send this letter to your good self with a request that clarification on the correct nature of the Order dated 30 th March 2010 of the HRD Ministry may be given to the UGC at an early date so that the long pending problem of senior Lecturers in Maharashtra numbering about 10000 may be resolved without further delay.

A copy of this letter is being sent to the Chairman of the UGC for information and necessary action at his level to seek clarification on the import and effect of Order of HRD dated 30 th March 2010.

With warm regards,

Yours faithfully
(C.R. Sadasivan)
President, MFUCTO

Copy forwarded with compliments to -
Shri Umashankar, Personal Secretary to the Hon'ble Minister for Human Resource Development Government of India, Shastri Bhavan, New Delhi. for information and necessary further action.

(C.R. Sadasivan)
President, MFUCTO

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS' ORGANIZATIONS (MFUCTO)**

**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, B-Road, Churchgate, Mumbai 400 020**

# PRESS RELEASE : 2nd AUGUST 2010

At the call of Maharashtra Federation of University & College Teachers' Organisations (**MFUCTO**), nearly three thousand University and college teachers from the ten non-agricultural universities in Maharashtra assembled at Janter- Manter, New Delhi to participate in a **MASSIVE DEMONSTRATION** today, **2 nd August 2010** from 11.00 a.m.

The demonstration was to express strong protest of the academic community in the State against the illegal and arbitrary **order dated 30 th March 2010 passed by the Union HRD Ministry** directing the UGC to cancel/ withdraw the decision taken by the UGC on 23 rd February 2010 granting exemption from NET to more than 3000 teachers. Though the decision of the UGC was legal and proper and based on the Judgments of the three Division Benches of the Bombay High Court, the UGC under the pressure of the MHRD has meekly accepted the Order as a fait accompli.

Thousands of teachers who have been in service since September 1991 or appointed thereafter and who have completed a minimum of 11 years and maximum of 19 years service are being denied their rights to claim exemption from NET in spite of the High Court Judgments.

MFUCTO had intimated all the Members of Parliament – Lok Sabha and Rajya Sabha – from Maharashtra of the demonstration being held at Jantar Mantar by the teachers and requested them to remain present at Jantar Mantar and address them as also to raise the issue in both the Houses of Parliament. **Four Loksabha Members from the BJP addressed the Dharna and Shri Haribhau Jawade raised the issue in the zero hour. Shri Basudev Acharia, Loksabha MP from the CPI(M) also addressed the Dharna.**

**Rajya Sabha MP Ms. Brinda Karat personally intervened in this matter and impressed upon Hon'ble HRD Minister Kapil Sibal to meet MFUCTO delegation. As a result an 8-member MFUCTO delegation, accompanied by Shri Basudev Acharia met Shri Kapil Sibal at 12.45 p.m. and the meeting lasted for about 30 minutes.**

The MFUCTO delegation pointed out that due to the MHRD Order dated 30 th March 2010 the UGC had cancelled all the exemptions already given and this had created serious anomalies and caused injustice to thousands of teachers. **The Minister and the MHRD officials categorically stated that the MHRD Order was to cancel exemptions granted in respect of only those appointments that were made after JUNE 2009. The Minister also pointed out that it was not the intention of the MHRD to cancel the exemptions granted in respect of appointments made prior to June 2009**.

At the direction of the HRD Minister, a meeting was fixed between the Chairman and officials of the UGC with the MFUCTO at 5.30 p.m. on the same day. UGC Chairman assured MFUCTO delegation that the UGC will seek clarification from the MHRD and then take the necessary steps.

**Through this massive demonstration a new hope is generated to resolve the long pending problem of teachers in Maharashtra**

**New Delhi**

**(C.R. SADASIVAN)** PRESIDENT — **M F U C T O** — **(E.H. KATHALE)** GENERAL SECRETARY

# संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक

*महाराष्ट्र विधानपरिषद : शुक्रवार, दिनांक २३ जुलै २०१० : दुसरे अधिवेशन २०१०*

(६) * ६९१२ **श्री.दिलीपराव सोनवणे , प्रा.बी.टी.देशमुख , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे** : दिनांक २६ मार्च, २०१० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या पाचव्या यादीतील प्रश्न क्रमांक १६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणूकीबाबत मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ च्या याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे कारवाई करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई झालेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड, श्री.राजेश टोपे यांच्याकरिता** : (१),(२) व (३) **संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजूर करण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता मिळालेली नाही.**

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

"**संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजूर करण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता मिळालेली नाही**" याऐवजी "**संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजूर करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे**" असे वाचण्यात यावे.

**प्रा. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी छापील उत्तरामध्ये केलेली दुरुस्ती स्वागतार्ह आहे. याचे कारण अगोदर देण्यात आलेले उत्तर स्वागतार्ह नव्हते. भेदभावपूर्ण वागणूक दिल्याचे प्रकरण हायकोर्टामध्ये मांडण्यात आले तेव्हा दि. २६ नोव्हेंबर २००७ रोजी हायकोर्टाने निर्णय दिला की, हा एवढा भेदभाव आहे, तो तुम्ही तपासा व आठ आठवड्यात त्याबाबत निर्णय करा. हायकोर्टाने आठ आठवड्यात निर्णय करा असे सांगितल्यानंतरही तो निर्णय झाला नाही. हायकोर्टाने त्या शिक्षकांना, पिटीशनर्सना, मॅनेजमेंटला सांगितले होते की, तुमच्याकडे असलेले मुद्दे तुम्ही शासनासमोर मांडा. त्याप्रमाणे त्यांनी २३ भेदभावाचे मुद्दे असलेले निवेदन मंत्रिमहोदयांकडे, शासनाकडे दिल्यानंतर हे भेदभावाचे मुद्दे असल्याचे मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये कबूल केले होते. आणि हे भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी पॉझीटीव्ह निर्णय घेऊ असे ते म्हणाले. दिनांक २३ डिसेंबर २००८ रोजी ते असे म्हणाले की, "**हा विषय उच्च शिक्षण विभागाकडून मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी आणला जाईल आणि पुढील अधिवेशनाच्या अगोदर या विषयाच्या संदर्भात सकारात्मक निर्णय घेतला जाईल.**" असे सांगितल्यानंतर आजचे हे भयानक उत्तर या ठिकाणी आले. ते दुरुस्त केल्याबद्दल मी आपला आभारी आहे. कुणीतरी त्यासाठी निर्णयासाठी वेळ दिला पाहिजे हे हायकोर्टाने सांगितल्यानंतर आठ हप्त्यामध्ये निर्णय घेतला नाही हे योग्य झाले नाही. आपण सांगितल्यानंतर सुध्दा त्याबद्दल निर्णय झाला नाही. आणि म्हणून याठिकाणी देण्यात आलेले उत्तर चुकीचे होते त्याबद्दल मी जास्त बोलत नाही ते आपण दुरुस्त केले आहे. तेव्हा यासंबंधीचा निर्णय केव्हा होईल? आठ दिवसात होईल? एक महिन्यात होईल की, दोन महिन्यात होईल?

**प्रा. वर्षा गायकवाड** : सभापती महोदय, या संदर्भात लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

**श्री. विक्रम काळे** : सभापती महोदय, शासन वारंवार म्हणते की, सर्वांनी कॉम्प्युटर शिकले पाहिजे. कॉम्प्युटर चालविण्याचे ज्ञान सर्वांना आले पाहिजे. पूर्वी अशी म्हण होती की, ज्याला लिहिता वाचता येते तो साक्षर त्याप्रमाणे ज्याला कॉम्प्युटर चालविता येते तो साक्षर म्हटले जाते. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी लवकरात लवकर निर्णय घेऊ असे सांगितले आहे. हा विषय मंत्रिमंडळासमोर गेला आहे की नाही? गेला असेल तर या प्रस्तावाला आपण किती दिवसात मान्यता घेणार आहात?

**प्रा. वर्षा गायकवाड** : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर आधीच दिलेले आहे. या संदर्भातील विचार लवकर करुन लवकरात लवकर हा प्रश्न मंत्रिमंडळासमोर नेण्याचा प्रयत्न करु.

**श्री.वसंतराव पवार** : सभापती महोदय, संगणक शास्त्राचे महत्व सन्माननीय सदस्यांनी सांगितलेलेच आहे. माझा प्रश्न असा आहे की, संगणक घेण्यासाठी आणि संगणक शिकविणाऱ्या शिक्षकांच्या पगारासाठी या दोन्ही बाबींचा अंतर्भाव या अनुदानामध्ये आहे काय? माझा दुसरा प्रश्न असा की, शासनाने या वर्षी कुठल्याही नवीन महाविद्यालयांना परवानगी दिलेली नाही असे समजते. शासन संगणक शास्त्राचे तसेच व्यवस्थापन शास्त्राचे नवीन महाविद्यालय देण्याचे धोरण स्वीकारणार आहे काय?

**प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे की, संगणक शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी पैसे देण्यात येणार आहेत.** सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांचे जे म्हणणे आहे तेच शासनाचे म्हणणे आहे. आजचे युग हे संगणकीय युग आहे आणि **त्यादृष्टिकोनातून शासनाच्या माध्यमातून लवकरात लवकर पाऊले उचलण्यात येत आहेत.**

**श्री. वसंत पवार** : सभापती महोदय, इयत्ता दहावीचा मोठया प्रमाणात निकाल लागलेला आहे तसेच इयत्ता बारावीचा निकाल देखील चांगला लागलेला आहे. म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात नवीन महाविद्यालये देण्याची गरज आहे. पण शासनाचे या बाबतीत आखडते धोरण आहे. अनुदानित नाही तर विनाअनुदानित महाविद्यालयांना परवानगी का देण्यात येत नाही?

**प्रा. वर्षा गायकवाड** : सभापती महोदय, हा प्रश्न शासनाच्या विचाराधिन आहे.

**श्री. भगवान साळुंखे** : सभापती महोदय, संगणकशास्त्र हा विषय सीनिअर कॉलेजला देऊन जवळ जवळ दहा वर्षे झालेली आहेत. या विषयाचे प्राध्यापक त्या ठिकाणी काम करीत आहेत. कॉलेजेस ग्रॅन्टेबल आहेत पण विषय मात्र ग्रॅन्टेबल नाहीत. त्यासाठी प्रचंड प्रमाणात फी घेतली जाते. शिक्षकाला योग्य पगार दिला जात नाही. त्या शिक्षकाच्या हाताखाली शिकलेला विद्यार्थी तीनतीन लाख रुपयाचे पॅकेज घेत आहे पण दहा वर्ष एम.सी.ए. झालेला प्राध्यापक हजार आणि दोन हजार रुपयावर राबत आहे. त्याची आता चाळीशी ओलांडत आलेली आहे. त्यांना संस्था काही देत नाहीत आणि शासन जबाबदारी घेत नाही. या कॉलेजेसना अनुदान देण्याची शासनाची मानसिकता नाही. म्हणून संगणक खरेदी करण्यापासून प्राध्यापकाला सीनियरचे स्केल देण्याबाबतची कारवाई शासनाने तातडीने केली पाहिजे. या संबंधात शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी.

**प्रा. वर्षा गायकवाड** : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर आधीच दिले आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, मी या ठिकाणी महत्वाचा प्रश्न उपस्थित करु इच्छितो. जे सभागृहात बोलणे उचित नाही जे उत्तर देणे योग्य नाही असे उत्तर या ठिकाणी दिले जाऊ नये. माननीय राज्यमंत्र्यांनी ते दुरुस्त करावे किंवा माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी बसलेले आहेत त्यांनी ते दुरुस्त करावे. सभापती महोदय, हायकोर्टाच्या निर्णयाची एक ओळ मी याठिकाणी वाचून दाखवितो. "The Government is directed to take decision in this respect within a period of 8 weeks from the date of receipt of such representation." १९ डिसेंबर,२००७ ला शासनाला हे निवेदन मिळाले. हे निवेदन मिळाल्यापासून आठ आठवड्याच्या आत निर्णय करा असे हायकोर्टाचे आदेशच आहेत. मी मुद्दाम सांगत आहे कारण माननीय राज्यमंत्री महोदयांनी लवकरात लवकर असे म्हटले आहे. आमचा कन्टेम्प्ट आम्ही सहन करुन घेऊ. सभागृहाचा कन्टेम्प्ट सभागृह काही वेळा सहन करू शकेल पण हायकोर्टाच्या बाबतीत असा निर्णय झाल्यानंतर असे उत्तर देणे हे बरोबर नाही. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी ते उत्तर दुरुस्त करावे.

**प्रा. वर्षा गायकवाड** : सभापती महोदय, सभागृहाचा मान ठेवला पाहिजे आणि कोर्टाचा सुध्दा मान ठेवला पाहिजे. **सभागृहाची भावना ओळखून यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडे सोमवारी बैठक घेण्यात येईल.**

*****

# महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी व महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या चर्चेअंती १० मुद्यांवर मतैक्य

## मुद्याचे स्वरुप व मुद्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा मुद्देनिहाय तपशील

"महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे (MFUCTO) प्रतिनिधी व महाराष्ट्र शासनाच्या वतीने उच्च शिक्षण मंत्री व मुख्य सचिव यांच्यात मंत्रालयातील,**मा.मुख्य सचिवांच्या दालनात दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या चर्चेअंती निरनिराळ्या १० मुद्यांवर मतैक्य झाले व अशा मुद्यांचे इतिवृत्त त्याच दिवशी उभयपक्षी स्वाक्षरीत झाले हे खरे आहे काय," या तारांकित प्रश्न क्रमांक २५९८ च्या भाग १ ला** गुरुवार, दिनांक १ एप्रिल, २०१० रोजी एका शब्दात 'होय' असे उत्तर मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी दिले होते व पुढे दिनांक २६ ऑगस्ट, २००९ च्या इतिवृत्तातील **मुद्यांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा मुद्देनिहाय तपशील प्रश्न भाग २ च्या उत्तरात देण्यात आला होता. (अ) इतिवृत्तातील मुद्याचे स्वरुप (ब) शासनातर्फे करण्यात आलेली कारवाई (क) बुलेटीन संपादकांचे अभिप्राय मुद्दे निहाय पुढील प्रमाणे :-**

### *मुद्दा क्रमांक : १*

**(अ) इतिवृत्तातील मुद्याचे स्वरुप :** (१) केंद्र शासनाने पाठविलेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन सुधारणा विषयीची समग्र योजना राज्य शासनाने विचारात घेऊन **त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक १२.८.२००९ रोजी निर्गमित केला.** या योजनेची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य मिळावे असे उद्दीष्ट राहील. हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून **न मिळाल्यास ८० टक्के थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देईल.**

**(ब) शासनातर्फे करण्यात आलेली कारवाई :** केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य न मिळाल्यास थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देणार आहे. परंतु केंद्र शासनाने अद्याप तसा निर्णय घेतला नसल्यामुळे राज्य शासनाकडून सद्यःस्थितीत याबाबत कोणतेही आदेश काढण्याची आवश्यकता नाही.

**(क) बुलेटीन संपादकांचे अभिप्राय : काही नाही**

### *मुद्दा क्रमांक : २, ३ व ४*

**(अ) इतिवृत्तातील मुद्याचे स्वरुप :** (२) शासनाचे दि. १२ ऑगस्ट, २००९ चे निर्णयातील परिच्छेद ८ (E) (V) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी. :-

"The revised pay scale shall be applicable only to those teachers who are covered in the above mentioned para 8 E (i) to (iv) and **non NET /SLET teachers approved by the University.** The latter will be placed in the lowest pay scale of the teachers (Assistant Professors). Similar amendment will be made in paragraph 12 (i)."

(३) शासन निर्णयातील परिच्छेद १४ मधील पहिल्या वाक्यातील '**subject**' या शब्दाऐवजी '**according**' अशी दुरुस्ती करण्यात येईल.

(४) शासन निर्णयातील परिच्छेद ८ (ब) मधील तिसऱ्या ओळीतील "Benefits" या शब्दानंतर "Including leave package" हा शब्द समाविष्ट करण्यात यावा.

**(ब) शासनातर्फे करण्यात आलेली कारवाई : मुद्दा क्र. २, ३ व ४** च्या अनुषंगाने दि. १९.११.२००९ रोजी आदेश निर्गमित केले आहेत.

**(क) बुलेटीन संपादकांचे अभिप्राय :** दि. १९.११.२००९ रोजीचा शासन निर्णय सन २००९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ २२९ वर प्रसृत केला आहे.

### *मुद्दा क्रमांक : ५*

**(अ) इतिवृत्तातील मुद्याचे स्वरुप :** (५) विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या तरतूदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेगवेगळ्या याचिकांमध्ये (मुख्यतः याचिका क्र. : ५०२२/२००१, क्र. ५३७५/२००१, क्र. ४२६६/२००६) वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, **नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील.** याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडे समन्वय करण्यासाठी शासनाचे दोन अधिकारी व एमफुक्टोचे दोन प्रतिनिधी यांची एक समिती पाठपुराव्यासाठी नेमली जाईल. याबाबत इतर कार्यवाही शासन पत्र दिनांक ३१ जुलै, २००९ व ४ ऑगस्ट, २००९ च्या पत्रातील परिच्छेद (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल. तथापि, अशासकीय व संघटनांच्या प्रतिनिधींना कोणताही भत्ता व प्रवास खर्च शासनाकडून मिळणार नाही.

**(ब) शासनातर्फे करण्यात आलेली कारवाई : मुद्दा क्र.५ :-** समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.

**(क) बुलेटीन संपादकांचे अभिप्राय :** समिती नियुक्त करण्याबाबतचे आदेश सन २०१० च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ २७ वर प्रसृत केले आहेत.

### *मुद्दा क्रमांक : ६*

**(अ) इतिवृत्तातील मुद्याचे स्वरुप :** (६) **शिक्षकाच्या संप कालावधीतील पगार** त्यांना तुर्त अदा करण्यात येऊ नये. तथापि, संपाच्या कालावधीत विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान शिक्षकांना अनुज्ञेय असलेल्या Vacation Leave च्या कालावधीत अधिकचे तास घेऊन भरून काढावे **व विहीत अभ्यासक्रम पूर्ण करावा.** संबंधीत शिक्षकांनी संपाचे पूर्ण दिवस भरून काढले आहेत किंवा कसे, याबाबत विद्यापीठाने खात्री करुन तशा प्रकारचे प्रमाणपत्र संबंधीत विभागीय सहसंचालक (उ.शि.) यांचेकडे सादर करावे. ~~विद्यापीठाने~~ असे प्रमाणपत्र संबंधित विद्यापीठाने संबंधित सहसंचालकांना सादर केल्यावर या संप कालावधीचा पगार देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**(ब) शासनातर्फे करण्यात आलेली कारवाई : मुद्दा क्र.६ :-** च्या अनुषंगाने दि. २९.८.२००९ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे.

---

**महाराष्ट्र शासन : शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**

**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१**

Web: www.dirhe.org E-Mail:dirhe@pn2.Vsnl.net.in

फोन नं. ०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९,
फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

***क्र. उशिस/४०१०/एमफुक्टो/बैठक/मवि-१***

***दिनांक १८.०१.२०१०***

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण

**विषय :-** एमफुक्टो या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत दिनांक २६/०८/२००९ रोजी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.

**संदर्भ :-** शासनाचे पत्र क्र. संकीर्ण/२००९/३५९/०९/विशि-१, दि. ०७/०९/२००९.

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय शासनपत्राचे अवलोकन व्हावे. प्रस्तुत शासनपत्र व त्यासोबतचे सहपत्र सुलभ संदर्भासाठी सोबत जोडत आहे. दिनांक २६.०८.२००९ रोजी मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन व एमफुक्टो संघटनेचे प्रतिनिधी यांचेमध्ये झालेल्या बैठकीचे कार्यवृत्तातील मुद्दा क्र. १० मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी. शैक्षणिक बाबींवर चर्चा करण्यासाठी वर्षातुन दोन वेळा यानुसार सहा महिन्यातुन एकदा एमफुक्टोच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेण्यात यावी. तसेच संबंधित कार्यवाहीचे / बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात यावीत व त्यांची एक प्रत संचालनालयात सादर करावी.

**(डॉ. रा. वि. किर्दक)**
संचालक (उच्च शिक्षण) म. रा., पुणे-१

**प्रत :** मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना संदर्भिय पत्रान्वये माहितीस्तव सादर.

**(क) बुलेटीन संपादकांचे अभिप्राय :** दि. २९.८.२००९ रोजी निर्गमित केलेले परिपत्रक सन २००९ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ -१५६ वर प्रसृत केले आहे.

### *मुद्दा क्रमांक : ७*

**(अ) इतिवृत्तातील मुद्याचे स्वरुप :** (७) शासनाचे क्र. संकीर्ण-२००९/(३५९/०९)/विशि-१ दिनांक २४ ऑगस्ट, २००९ च्या पत्रान्वये विद्यापीठाचे कुलगुरू व संबंधीत विभागीय सहसंचालक यांना दिलेल्या सूचना मागे घेण्यात येत असल्याचे कळविण्यात येईल.

**(ब) शासनातर्फे करण्यात आलेली कारवाई : मुद्दा क्र.७ :-** च्या अनुषंगाने दि. १ सप्टेंबर, २००९ रोजी पत्र निर्गमित करण्यात आले आहे.

**(क) बुलेटीन संपादकांचे अभिप्राय :** दि. १ सप्टेंबर, २००९ रोजीचे पत्र सन २०१० च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ६५ वर प्रसृत केले आहे.

### *मुद्दा क्रमांक : ८*

**(अ) इतिवृत्तातील मुद्याचे स्वरुप :** (८) सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या शिक्षकांनासुध्दा वरील प्रमाणे सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबतचे विनंती पत्र मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण हे मा. मंत्री, सामाजिक न्याय यांना पाठवतील.

**(ब) शासनातर्फे करण्यात आलेली कारवाई : मुद्दा क्र.८ :-** च्या अनुषंगाने मा.मंत्री, सामाजिक न्याय यांना पत्र पाठविले आहे.

**(क) बुलेटीन संपादकांचे अभिप्राय :** मा.मंत्री, सामाजिक न्याय यांना पाठविलेले दिनांक ३१ मार्च २०१० रोजीचे पत्र सन २०१० च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ७० वर प्रसृत केले आहे.

### *मुद्दा क्रमांक : ९*

**(अ) इतिवृत्तातील मुद्याचे स्वरुप :** (९) AICTE व केंद्रिय मानव संसाधन मंत्रालय यांच्याकडून सहाव्या वेतन आयोगाबद्दल आदेश प्राप्त झाल्यानंतर अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासाठी योग्य ती कार्यवाही विभागाकडून करण्यात येईल.

**(ब) शासनातर्फे करण्यात आलेली कारवाई : मुद्दा क्र.९ :-** च्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

**(क) बुलेटीन संपादकांचे अभिप्राय :** (i) "सभापती महोदय, **दोन महिन्याच्या आत लागू होईल. एआयसीटीईने ते लागू केलेले आहे. त्यानुसार तंत्रशिक्षण विभागाला सुध्दा लागू केले जाईल." असे शासनातर्फे मा. राज्यमंत्र्यांनी गुरुवार, दिनांक १ एप्रिल २०१० रोजी सभागृहात सांगितले.** (ii) "येत्या महिन्याभरामध्ये ही प्रोसेस पूर्ण केली जाईल" असे मा. राज्यमंत्र्यांनी शुक्रवार, दिनांक २३ जुलै २०१० रोजी सभागृहात सांगितले.

### *मुद्दा क्रमांक : १०*

**(अ) इतिवृत्तातील मुद्याचे स्वरुप :** एमफुक्टोच्या प्रतिनिधींबरोबर संबंधित सहसंचालक सहा महिन्यातून एकदा व संचालक वर्षातून एकदा बैठक घेऊन आवश्यक त्या मुद्यांवर चर्चा करतील. जेणेकरुन, शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी मदत मिळेल.

**(ब) शासनातर्फे करण्यात आलेली कारवाई : मुद्दा क्र.१० :-** च्या अनुषंगाने दि. ७ सप्टेंबर, २००९ रोजी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**(क) बुलेटीन संपादकांचे अभिप्राय :** (i) दि. ७ सप्टेंबर, २००९ रोजी देण्यात आलेल्या सूचना सन २०१० च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ६९ वर प्रसृत केले आहे. (ii) मा. संचालकांचे आदेश सन २०१० च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ८८ वर प्रसृत केले आहे.

## इतिवृत्तामधील मतैक्यांच्या मुद्यावर संचालक, उच्च शिक्षण यांचेकडून कारवाई न होणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : शुक्रवार, दिनांक २३ जुलै २०१० : दुसरे अधिवेशन २०१०*

(३) * ७०८८ **प्रा.बी.टी.देशमुख , श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री. विक्रम काळे** : तारांकित प्रश्न क्रमांक २५९८ ला दिनांक १ एप्रिल, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे (MFUCTO) प्रतिनिधी व महाराष्ट्र शासनाच्यावतीने मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री व मुख्य सचिव यांच्या मंत्रालयातील, मुख्य सचिवांच्या दालनात दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या चर्चेअंती निरनिराळ्या १० मुद्यांवर मतैक्य झाले त्यापैकी क्रमांक दहाच्या मुद्यावर संचालक उच्च व तंत्र शिक्षण यांनी पुढील कारवाई करावी असे शासनाने दिनांक ७ सप्टेंबर, २००९ रोजी आदेश दिलेले असताना संचालक उच्च व तंत्र शिक्षण यांचेकडून मात्र याबाबतच्या सूचना किंवा परिपत्रक निर्गमित करण्याची कोणतीही कारवाई पार पडली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत उच्च व तंत्र शिक्षण संचालकांनी कोणतीही कारवाई न करण्याचे कारण काय आहे,

(३) कारवाई केलेली असल्यास, करण्यात आलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे ?

**श्रीमती वर्षा गायकवाड,श्री. राजेशे टोपे यांच्याकरिता :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) विभागीय सह संचालकांनी त्यांचे स्तरावर आवश्यक कारवाई करण्याकरिता दि.१८-१-२०१० नुसार सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, १० मुद्यांसंबंधीचा प्रश्न होता. जवळ जवळ बहुतेक प्रश्नांसबंधी शासनाने समाधानकारक कारवाई केली आहे. ९ आणि १० मुद्यांसंबंधी थोडी गडबड झाली होती. माझे एकेका वाक्याचे दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, दिनांक १८.१.२०१० रोजी सूचना निर्गमित केल्या आहेत. सहसंचालकांना, संचालकांनी सूचना निर्गमित केल्या आहेत की शासनाने? संचालकांना देखील काही सूचना द्यावयाच्या होत्या. त्या कोणी दिल्या आहेत. त्या सूचना या पत्रकामध्ये आहेत काय ?

**श्रीमती वर्षा गायकवाड :** सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नासंबंधी असे सांगू इच्छिते की, संचालकांनी, सहसंचालकांना दिनांक १८.१.२०१० रोजी पत्र पाठविले आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांना असे विचारू इच्छितो की,संचालकांनी वर्षातून एकदा बैठक घ्यायची होती. त्यांना देण्यात आलेल्या सूचना ह्या त्याच पत्रात आहेत काय ?

**श्रीमती वर्षा गायकवाड :** होय.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मग माझा दुसरा प्रश्न नवव्या मुद्यासंबंधी आहे. अभियांत्रिकी महाविद्यालांसाठी शासन निर्णय दोन महिन्यात निर्गमित करण्यात येईल असे ३ महिन्यापूर्वी सांगितले होते. तो शासन निर्णय अजून निर्गमित झालेला नाही. याबाबत काही त्रुटी AICTE ने काढल्या होत्या, हे त्यामध्ये आले आहे. दहा मुद्यांपैकी जो नववा मुद्दा आहे त्यासंबधी दोन महिन्यामध्ये जी.आर.काढणार असे सांगितले होते तो अद्याप निर्गमित झालेला नाही. आता निदान १५ दिवसात किंवा एक महिन्यात त्याबाबतचे आदेश निर्गमित होतील काय ?

**श्रीमती वर्षा गायकवाड :** सभापती महोदय, अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगामध्ये सांगितल्याप्रमाणे प्रस्ताव येत्या कॅबिनेटसमोर घेऊन जाऊ व तो कॅबिनेटमध्ये मान्य केला जाईल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, माझे म्हणणे असे आहे की, आपण काही तरी टाईम बॉऊंड सांगितले पाहिजे की, महिन्यामध्ये, पंधरा दिवसामध्ये हे आदेश निर्गमित होतील. त्याप्रमाणे आपण उत्तर देणार काय?

**श्रीमती वर्षा गायकवाड :** सभापती महोदय, येत्या महिन्याभरामध्ये ही प्रोसेस पूर्ण केली जाईल.

*****

# सेवानिवृत्ती वेतन योजना राज्यात अंमलात आणतांना त्यातील काही महत्वाच्या तरतुदी राज्य शासनाने न स्वीकारणे

*महाराष्ट्र विधानपरिषद :* *: दुसरे अधिवेशन २०१०*

*मंगळवार, दिनांक २० जुलै २०१०*

(५) * ६९०७ **श्री.दिलीपराव सोनवणे , प्रा.बी.टी.देशमुख , श्री.वसंतराव खोटरे , श्री. विक्रम काळे** : सन्माननीय वित्त मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने लागू केलेल्या सहाव्या वेतन आयोगाशी समकक्ष सेवानिवृत्ती वेतन योजना राज्यात अंमलात आणताना त्यातील काही महत्वाच्या तरतूदी राज्य शासनाने न स्विकारणे, काही योजनांबाबत अजूनही शासन निर्णय निर्गमित न होणे, 'कन्सोलिडेटेड पेन्शन' नवीन वेतनश्रेणीच्या किमान वेतनाच्या निम्म्याहून कमी निश्चित झालेली असणे, एका विशिष्ट तारखेपूर्वी (१ जानेवारी, २००६) व त्या तारखेनंतर निवृत्त झालेल्या सेवानिवृत्तांमध्ये असा भेदभाव करणे घटनेच्या कलम १४ चा भंग करणारे असल्याचा मा.सर्वोच्च न्यायालयाने डी.एस.नकारा विरुध्द केंद्र शासन प्रकरणात (ISCC 305/1983) दिलेला निर्णय याबाबत महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनच्या अध्यक्षांनी अतिरिक्त सचिव, वित्त विभाग यांना दिनांक २० जानेवारी, २०१० रोजी किंवा त्या सुमारास एक निवेदन देऊन अनेक त्रुटी लक्षात आणून दिल्या असून या संदर्भात उपरोक्त सर्वच त्रुटी व विशेषतः दिनांक १ जानेवारी, २००६ पूर्वी व नंतर निवृत्त झालेले/होणारे शासकीय कर्मचारी यांच्यातील भेदभाव संपुष्टात आणण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्यापही निर्णय झालेला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.विजय वडेट्टीवार,श्री.सुनिल तटकरे यांच्याकरिता** : (१) व (२) (३) सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या विविध वेतनश्रेणींचा अभ्यास करुन राज्य शासकीय व इतर पात्र निवृत्तीवेतनधारकांची निवृत्तीवेतन निश्चिती व अनुषंगीक बाबींसंबंधी शिफारशी करण्यासाठी श्री.पी.एम.ए.हकीम, केंद्र शासनाचे माजी सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ यांनी शासनास सादर केलेल्या शिफारशी स्विकृत करण्याचा निर्णय जाणिपूर्वक घेण्यात आला असून त्यानुसार दि.१.१.२००६ पूर्वी व दि. १.१.२००६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनात सुधारणा करण्याचे आदेश अनुक्रमे दिनांक ५.५.२००९ व दि.३०.१०.२००९ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनच्या अध्यक्षांनी वित्त विभागास दिनांक २० जानेवारी, २०१० रोजी दिलेले निवेदन प्राप्त झाले असून त्यामध्ये केंद्रीय निवृत्तीधारकांना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केलेले सर्व लाभ राज्यातील निवृत्तीवेतनधारकांना लागु करण्याची विनंती केली आहे.

दरम्यानच्या काळात केंद्रीय निवृत्तीधारकांना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केलेले सर्व लाभ राज्यातील निवृत्तीवेतनधारकांना लागु करण्यासाठी महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन व इतर काही जणांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. या याचिका मा. उच्च न्यालयाने दाखल करुन घेतल्या असून त्या सुनावणीसाठी प्रलंबित आहेत. त्यामुळे ही बाब न्यायप्रविष्ट आहे.

**श्री.दिलीपराव सोनवणे** : सभापती महोदय, केन्द्र सरकारने त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी सहावा वेतन आयोग लागू केलेला असून सहाव्या वेतन आयोगाशी समकक्ष सेवानिवृत्ती वेतन योजना राज्यात अंमलात आणतांना त्यातील काही महत्वाच्या तरतुदी राज्य शासनाने न स्वीकारल्यामुळे राज्य शासनाच्या निवृत्त कर्मचाऱ्यांवर अन्याय झालेला आहे. निवृत्ती वेतन सुधारणा आदेशाच्या अनुषंगाने काही शासन निर्णय काढण्यात आलेले आहेत परंतु त्यात काही त्रुटी असल्यामुळे त्यात सुधारणा करण्यात यावी यासाठी राज्य शासनाला निवेदन देण्यात आले होते. दिनांक २२ मार्च २०१० रोजी या विषयावरील एका लक्षवेधी सूचनेवरील प्रश्नाला उत्तर देतांना माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, "सिफारस लागू करनेके बारेमे सरकार विचार कर रही है." आता मात्र असे उत्तर दिलेले आहे की, "उच्च न्यायालयाकडे ही बाब न्यायप्रविष्ट आहे." म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, राज्य वेतन सुधारणा समितीने याबद्दल काय शिफारस केली आहे? आणि त्यावर शासनाने काय विचार केला आहे?

**श्री.सुनील तटकरे** : सभापती महोदय, सहावा वेतन आयोगाच्या समकक्ष सेवानिवृत्ती वेतन योजना अंमलात आली. त्यावेळी त्या योजनेचा अभ्यास करुन शिफारस करण्यासाठी शासनाने हकिम समितीची नियुक्ती केली होती. त्या समितीने केलेल्या काही शिफारशी राज्य सरकारने मंजूर केल्या व त्याप्रमाणे अंमलबजावणी सुरु केली. ती करीत असतांना या संदर्भात वेगवेगळया विभागाच्या वेगवेगळया संघटनांचे जे आक्षेप होते किंवा म्हणणे होते ते ऐकून घेण्यासाठी वेतन त्रुटी समिती गठीत करण्यात आली. त्या समितीपुढे वेगवेगळया विभागाच्या संघटनांची प्रकरणे गेली. परंतु सेवानिवृत्तांच्या प्रकरणाचा वेतन त्रुटी समितीशी संबंध नसल्यामुळे त्यांची प्रकरणे गेली नाहीत. म्हणून या संदर्भात पेन्शनर्स असोसिएशनने उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली असल्यामुळे उच्च न्यायालयाचा निर्णय लागल्यानंतर या संदर्भात निर्णय घेतला जाईल.

**प्रा. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, सेवानिवृत्तांची प्रकरणे वेतन त्रुटी समितीच्या अंतर्गत येत नाहीत, तो त्या समितीचा विषय नाही हे मंत्रिमहोदयांनी याठिकाणी सांगितले. त्यांना त्याकरिता फोरम उपलब्ध नाही, म्हणून त्यांनी दिलेले निवेदन आपण मान्य केले. सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत काही चुकीचा निर्णय होणे योग्य नाही. आता मंत्रिमहोदयांनी हे प्रकरण उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असल्याचे सांगितले. जर हे प्रकरण न्यायप्रविष्ठ नसेल तर मला दोनतीन लहान प्रश्न विचारावयाचे आहेत. उच्च न्यायालयामध्ये अर्ज केल्यानंतर ते प्रकरण न्यायप्रविष्ठ होत नाही, ते ॲडमिट झाल्यानंतर न्यायप्रविष्ठ होते. माझ्या खाजगी स्त्रोताद्वारे मिळविलेल्या माहितीनुसार ते प्रकरण अजून ॲडमिट झालेले नाही. आणि जर ॲडमिट झाले असेल तर मी प्रश्न विचारणार नाही. त्यामुळे प्रकरण जर ॲडमिट झाले असेल तर ते कोणत्या तारखेला ॲडमिट झाले?

**श्री सुनील तटकरे** : सभापती महोदय, क्रमांक १५३०/०९ ही याचिका उच्च न्यायालयामध्ये दाखल झाली आहे. त्याबाबत राज्य सरकारने जे काही धोरण स्वीकारावयाचे आहे, त्याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेतले आहेत. त्यामुळे त्या संदर्भातील आमची भूमिका आम्ही उच्च न्यायालयामध्ये मांडू.

**प्रा. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असे सांगितले. प्रकरण ॲडमिट झाल्यानंतर ते न्यायप्रविष्ठ होते. परंतु त्यांनी ॲडमिट झाल्याचे सांगितले नाही. दाखल झाले असे ते म्हणतात.

**श्री. सुनील तटकरे** : सभापती महोदय, याचिका न्यायालयामध्ये दाखल होते त्यावेळी त्या संदर्भात राज्य सरकारने आपली भूमिका शपथपत्राद्वारे स्पष्ट करावी असे उच्च न्यायालयाकडून सांगण्यात येते. त्यामुळे मला प्राप्त झालेल्या माहितीप्रमाणे हे प्रकरण उच्च न्यायालयामध्ये ॲडमिट झाले आहे.

**प्रा. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी प्रकरण उच्च न्यायालयामध्ये ॲडमिट झाल्याचे सांगितले आहे. त्यामुळे मी याबाबत प्रश्न विचारणार नाही. दिलेल्या माहितीबद्दल मी मंत्रिमहोदयांचा आभारी आहे.

*****

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATION

*Registered under the Trade Union Act 1926, No. By-II-8162 of 1985*

Affiliated to the All India federation of University and College Teachers' Organisations' (AIFUCTO)

**DATE : 15/05/2010**

To,
**Shri Rajesh Tope**
Hon'ble Minister for Higher & Technical Education
Maharashtra State, Mantralaya, Mumbai 400 032

**Through:** Joint Director Technical Education, Amravati.

**Subject:** Implementation of the AICTE recommended sixth pay commission scales of pay for teachers in the Engineering & Technology faculty with effect from 1.1.2006.

**References: (1)** Letter from the Ministry of Human Resources Development, Government of India No. 23-1/2008-TS-II dated 7 th October 2009.(Document 1) **(2)** AICTE notification no. F.No.37-3/Legal/2010 dated 5 th March 2010. (Document 2) **(3)** The minutes of the agreement between Government of Maharashtra & MFUCTO dated 26 th August 2009.(Document 3) **(4)** The AICTE Act, 1987 (No. 52 of 1987).(Document 4) **(5)** AICTE affidavit in the High Court of Judicature at Bombay (writ Petition No. 113 of 2003). (Document 5) **(6)** Writ Petition No. 364 of 1999 that on the enactment of the AICTE Act, 1987. (Document 6)

**Hon'ble Sir,**

It has come to be reported recently in the newspapers that the representatives of managements of unaided Engineering Colleges held a meeting with you as Hon'ble Minister for Higher & Technical Education at Pune. At this meeting a demand was made that the six pay commission recommended revised pay scales for unaided Engineering Colleges should be implemented in Maharashtra with effect from 1st August 2010. This demand is discriminatory, totally illegal and made to deny the teachers their legal rights.

In this respect we would like to bring to your kind knowledge the following facts:

1. You must be aware that by letter No. 23-1/2008-TS-II dated 7 th October 2009 the Ministry of Human Resources Development, Government of India, has intimated the State Government including Maharashtra of several measures taken from time to time in respect of revision of pay of teachers in degree level Engineering colleges and other degree level technical institutions. A copy of the said document dated 07-10-2009 is attached hereto marked as Document 1.

2. Thereafter the AICTE issued Notification . F.No.37-3/Legal/2010 dated 5 th March 2010 being Regulations called the AICTE (Pay Scales, Service Conditions and Qualifications for the teachers and other Academics Staff in Technical Institutions (Degree) Regulations, 2010). By these regulations the AICTE has made recommendations for implementations of the said sixth pay commission scales of pay for teachers and other academic staff in degree level Technical Institutions retrospectively with effect from 1-1-2006. **"The revised Pay and revised rates of Dearness Allowance under this scheme shall be effective from 01.01.2006"**. A copy of the said Regulations dated 5 th March 2010 of the AICTE is attached hereto marked as Document 2.

3. You are aware that the clause 9 of minutes of the agreement between Government of Maharashtra & MFUCTO dated 26 th August 2009 read as " AICTE व केंद्रिय मानव संसाधन मंत्रालय यांच्याकडून सहाव्या वेतन आयोगाबद्दल आदेश प्राप्त झाल्यानंतर अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासाठी योग्य ती कार्यवाही विभागाकडून करण्यात येईल. " is attached hereto marked as document 3.

4. The highest constitutional regulating & controlling body in the field of technical education is the AICTE, formed by the AICTE Act, 1987 (No. 52 of 1987), with a view to the proper planning & coordinated development of the technical education system throughout the country, the promotion of qualitative improvement of such education in relation to planned quantitative growth & the regulation & proper maintenance of norms & standards in the technical education system & for matters connected herewith. A copy of Act is attached hereto marked as document 4.

5. You must be aware that AICTE had submitted a affidavit in the High Court of Judicature at Bombay (writ Petition No. 113 of 2003 MFUCTO versus State of Maharashtra) states as under:

Para 13 :- I State & submit that the above mentioned scheme of the revised Pay Scales are to be implemented in accordance to the aforesaid notification dated 3 rd May 2000 of the AICTE.

Para14 :- I say that the Technical Institutions are bound/ obliged to pay the Pay Scales & other service terms & Conditions of the Technical Institutions as are necessary to maintain excellence in Technical Education & as informed by the AICTE from time to time. A copy of Affidavit is attached hereto marked as Document 5.

6. It is also well settled law enunciated through a catena of Judgment of Hon'ble High Court Judicature of Bombay Bench at Aurangabad (writ Petition No. 364 of 1999) as stated in Para 17:"**that on the enactment of the AICTE Act, 1987 it was the AICTE who was responsible to prescribe the pay scales & other service conditions of the teaching as well as non teaching staff in technical institutions like the Polytechnics & degree colleges".** A copy of judgment is attached hereto marked as Document 6.

In view of the foregoing, MFUCTO calls upon the Government not to fall a prey to the machinations of some of the managements but to immediately come out with the GR for implementation of the revised pay scales of the teachers in Engineering Colleges in the state of Maharashtra without any modification whatsoever including in the date of implementation viz, 1-1-2006 as has been done for various other categories of employees and teachers in the state already.

With Warm regards

Yours Truly,
**Dr.P.B.Raghuwanshi**
*Joint Secretary, MFUCTO*

Enclosures: as above

**Copy forwarded with Compliments to :-** Prof. B. T. Deshmukh, Hon'ble Member Maharahstra Legislative Council, Amravati.

## अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करणेबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : शुक्रवार, दिनांक १६ जुलै २०१० : दुसरे अधिवेशन २०१०*

(८) ७०८९ **श्री. बी.टी.देशमुख , श्री.वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे , श्री. विक्रम काळे** : तारांकित प्रश्न क्रमांक २६०० ला दिनांक २५ मार्च, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाने दिनांक ७ ऑक्टोबर, २००९ रोजी अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना दिनांक १ जानेवारी, २००६ पासून सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या असून, त्यानंतर अखिल भारतीय तंत्र शिक्षण मंडळाने (AICTE) दिनांक ५ मार्च, २०१० रोजी याबाबतची अंतीम अधिसूचना निर्गमित केलेली आहे, ही गोष्ट खरी आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी मुख्य सचिवांच्या दालनात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व प्रश्न भाग (१) मध्ये नमूद केलेली कागदपत्रे तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा दिनांक १२ ऑगस्ट, २००९ रोजीचा शासननिर्णय लक्षात आणून देवून याबाबत विभागाने तत्परतेने कारवाई करावी अशी मागणी करणारे एक निवेदन महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (MFUCTO) सहसचिवांनी मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना दिनांक १५ मे, २०१० रोजी किंवा त्या सुमारास सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण, अमरावती विभाग यांच्यामार्फत सादर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. राज्यमंत्री यांनी घोषित केल्याप्रमाणे अेआयसीटीईने लागू केल्याप्रमाणे दोन महिन्याच्या आत (१ जानेवारी २००६ पासून) या वेतनश्रेण्या लागू करण्याच्या संदर्भात शासनातर्फे काय कारवाई करण्यात आलेली आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे** : (१) होय.

(२) होय.

(३) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या दिनांक ५ मार्च, २०१० रोजीची अधिसूचनेतील काही बाबींबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून खुलासा मागविण्यात आला आहे. सदर खुलाशाच्या अधीन राहून विभागाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(४) कार्यवाही सुरु असल्याने विलंब झालेला नाही.

*****

# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY DIRECTION

**No. : 47/2010** **Date : 06.07. 2010**

**Subject :** Exemption to the Ph.D. holders of this university, from passing NET / SET, for recruitment and appointment of Assistant Professor or equivalent positions in universities, colleges and institutions.

Whereas, UGC, vide its letter No. 1-1/2002(PS-Exemption), dated 10th July, 2009, has communicated that Government of India, while notifying the revised scales of Pay for University & College teachers have exempted Ph.D. candidates from appearing in NET examination, who have done their Ph.D. through a process of registration, course work and external evaluation, as have been / or may be laid down by the UGC, through its regulations, as so adopted by the University. Accordingly, the UGC has issued the following two Regulations :

1) UGC Regulations on minimum qualifications required for the appointment and Career Advancement of Teachers in Universities and Institutions affiliated to it( 3rd amendment), Regulations, 2009.

2) UGC minimum standards and procedure for the award of M.Phil./Ph.D. degree, Regulations, 2009.

And

Whereas, UGC, vide its letter No. 1-1/2002(PS) Pt file-III, dated 28 th August, 2009, has communicated that both the above mentioned Regulations have been published in the Gazette of India, no.28, dated July 11-July 17, 2009 in Part III, Section 4. Thus, both the UGC Regulations have come into force with their publication in the Gazette of India.

And

Whereas, UGC, vide its letter No. 1-1/2002(PS-Exemption), dated 10th July, 2009, has also communicated that in order to streamline the work of giving exemption to the Universities fulfilling the minimum requirement as laid down in the above Regulations, the Commission has constituted the Standing Committee, under the Chairmanship of Prof. S. P. Thyagarajan, to identify the Universities which have followed UGC guidelines while awarding Ph.D.

And

Whereas, UGC, vide its letter No. 1-1/2002(PS) Pt file-III, dated 28 th August, 2009, has communicated that Commission has initiated the process of identifying candidates of various institutions, who have been awarded Ph.D. Degree in compliance of the provisions of the UGC [minimum standards and procedure for awards of M.Phil/Ph.D. Degree], Regulation, 2009, so as to exempt them from the requirement of minimum eligibility condition of NET/SLET for recruitment and appointment of Assistant Professor or equivalent positions in various universities, colleges and institutions.

And

Whereas, UGC, vide its letter No. 1-1/2002(PS) Pt file-III, dated 28th August, 2009, has also communicated that since, the above process is likely to take time, therefore, keeping in view the public interest and the interest of students at large in expediting the filling up of various vacant positions of Assistant Professor or equivalent positions in various universities, colleges and institutions, the Commission has decided, as an ad-hoc measure, to leave it to the concerned universities, colleges and institutions to decide as to whether the Degree of Ph.D. awarded to various candidates is in compliance of the provisions of UGC [minimum standards and procedure for awards of M.Phil./Ph.D. Degree] Regulation, 2009, so as to exempt them from the requirement of minimum eligibility condition of NET/SLET for recruitment and appointment of Asistant Professor o equivalent positions in their Universities, colleges and institutions.

And

Whereas, section 30(2)(g) of the Maharashtra Universities Act, 1994 provided as under :-

"30(2)(g) : Recommend to the State Government or otherwise of the qualifications as prescribed by the University Grants Commission for different categories of teachers and non- vocational academic staff, and for a particular post in these categories, whether in the university or in any affiliated college or a recognised institution, and prescribe additional qualifications, if any."

And

Whereas, the Academic Council of this university, in its meeting held on 28.5.2010, vide Item No.55, has resolved to exempt Ph.D. Degree holders of this University, from passing NET/SET examination, for recruitment and appointment of Assistant Professor or equivalent positions in universities, colleges and institutions.

Therefore, to give immediate effect to the exemption to the Ph.D. holders of this university, from passing NET/SET, as decided by the Academic Council, I, Dr. Kamal Singh, Vice Chancellor, Sant Gadge Baba Amravati University, Amravati, under powers conferred upon me, vide sub section (8) of section 14 of the Maharashtra Universities Act, 1994, hereby issue the following directions.

1. This direction shall be called "Exemption to the Ph.D. holders of this university, from passing NET/SET, for recruitment and appointment of Assistant Professor or equivalent positions in universities, colleges and institutions, Direction, 2010"

2. This direction shall come into force from the date of its issuance.

3. Following Ph.D. Degree holders of this University are exempted from passing NET / SET for recruitment and appointment of Assistant Professor or equivalent positions in universities, colleges and institutions.

(i) Those who have been awarded Ph.D.Degree by this university on or before 11th July,2009.

(ii) Those who have done their registration for Ph.D. in this University before 11th July, 2009 but shall be awarded Ph.D. Degree in due course of time, and

(iii) Those who shall be awarded Ph.D. Degree under Ordinance No. 19/2009 of this university would also be exempted from passing NET/SET examination since provisions of this Ordinance like process of registration, course work and external evaluation are in consonance with UGC's (minimum standards and procedure for awards of M.Phil/Ph.D.Degree) Regulation, 2009.

4. However, the orders issued by the University Grants Commission and the Government of Maharashtra from time to time in regard of qualifications shall be binding on the candidates recruited as Assistant Professors or on equivalent positions in universities, colleges and institutions on the basis of Ph.D. degree. The Non Agricultural Universities and Colleges in the state of Maharashtra should also consider the provisions of this Direction.

Place : Amravati. Sd/- Kamal Singh
Dated : 5 - 7 – 2010 Vice-Chancellor

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO. MAHBIL/ 2001/4448** Postal Registration No. ATI/RNP/78/ 2009-11 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/ 2009-11 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **13.08.2010**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,..........................................................................

..................................................................................

..................................................................................

..................................................................................

..................................................................................